दि. १३.०१.२०१७

दयानंदच्या तेजस धुमाळने रचला तबलावादनात इतिहास

लातूर - लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयाचा विद्यार्थी तेजस धुमाळ याने गुजरात राज्यातील म्हैसाना येथील गणपत विद्यापीठात संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठीय 'सतरंग युनी फेस्ट २०१७' या युवक महोत्सवात तबलावादन स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले. त्याला लेहऱ्याची साथ अभिजीत जाधव याने केली. दि. १० ते १४ फेब्रुवारी २०१७ या कालावधित कोल्हापूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी त्याची निवड झाली आहे.

तेजसने आजपर्यंत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात ५ वेळा सुवर्ण पदक, एक वेळा रौप्यपदक प्राप्त केले. तसेच त्याने राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सवात १ वेळा सुवर्ण पदक, २ वेळा रौप्यपदक पटकावले. क्रीडा व युवक संचालनालय, भारत सरकार यांच्याकडून घेण्यात आलेल्या खुल्या राज्यस्तरीय तबलावादन स्पर्धेत ३ वेळा महाराष्ट्रात प्रथम पारितोषिक मिळविले आहे. तसेच पश्चिम विभागीय युवक महोत्सवात त्याने २ वेळा रौप्यपदक प्राप्त केले तर २०१३ साली कुरूक्षेत्र, हरियाणा येथे झालेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात त्याला रौप्यपदक मिळाले आहे.

त्याच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सरचिटणीस रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव सुरेशजी जैन, प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. आत्माराम पळणीटकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्रा. बालाजी घुटे, प्रा.डॉ. पुष्पलत्ता अग्रवाल, प्रा. डॉ. देवेंद्र कुलकर्णी व कार्यालयीन अधिक्षक श्री. नवनाथ भालेराव यांनी अभिनंदन केले.

त्याला पं. शांतारामजी चिगरी व प्रा. संदीप जगदाळे यांचे मार्गदर्शन लाभले.